REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ९ ऑगस्ट, १९४४ अंक ३२



**भगवान भक्तीचा भुकेला !—**
येऊन जा बिगिबिगी
—हें चिमुकल्या मुलीचें गोड गीत ऐकून प्रत्यक्ष—
**भगवान भूतलीं धांवत आले !**
**डेक्कन —व— अपोलो**
ह्या दोन थिएटर्समध्यें
**व्ही. शांताराम** आणि **राजकमल** यांची दुसरी कलाकृति
शुक्रवार ता. ११ ऑगस्टपासून
**भक्तीचा मळा** (माली)
**सुरू होणार !**
प्रोड्यूसरः—व्ही. शांताराम, दिग्दर्शकः—केशवराव दाते,
पटकथा, पद्य व संवादः—स. अ. शुक्ल
**डेक्कन :** दररोज ४, ७ व १० वा. तिन्ही खेळ मराठी | **अपोलो :** फक्त एकच आठवडा ३॥, ६॥ हिंदी व १० वा. मराठी

गिरगांव मुंबई नं. ४
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

# दि डिस्काउंट बँक
## ऑफ इंडिया लिमिटेड

**शिवाजीनगर उपशाखेच्या कामाच्या वेळांत बदल**

कित्येक ठेवीदारांच्या आग्रहाच्या विनंतीवरून पुणें येथील जंगली महाराज रोडवरील शिवाजीनगर उपशाखा बँकेच्या कामाच्या वेळा ता. १० ऑगस्ट १९४४ पासून पुढील-प्रमाणें राहतील—

सोमवार ते शुक्रवार सकाळीं ८–३० ते १०–३० आणि सायंकाळीं ६ ते ८

शनिवारीं फक्त सकाळीं ८–३० ते १०–३०

रविवारीं सकाळीं १० ते दुपारीं १२

( बँक हॉलिडेला मात्र या बँकेचें काम बंद राहील. )

या बँकेच्या पुण्यांतील दोन्हीहि शाखांत पगार व पेन्शन बिलांची वसुली केली जाते.

—मॅनेजर



" मागोरा "चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

# ढेकणांच्या उदबत्त्या

( ABC )

## BUG COILS ( ABC )

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्यां उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।८, ट. ख. निराळा.

**दि मागोरा केमिकल कं. लि.,**
**हिराबाग, पुणें २**


# विविध माहिती

### मुलकी व्यवस्थेसाठी लष्करी अधिकारी

हिंदी मुलकी कारभारासाठी लायक अधिकाऱ्यांची तूट पडत आहे ती भरून काढण्यासाठी लष्करी अधिकारी तिकडे वर्ग करण्याची हिंदुस्थान सरकारची योजना जाहीर झाली आहे. सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा तहकूब केली नसती, तर जे उमेदवार त्या परीक्षेसाठी पुढें आले असते, अशाच प्रकारच्या लष्करी अधिकाऱ्यांतून हिंदुस्थान सरकार ह्या नव्या अधिकाऱ्यांची निवड करणार आहे, असें प्रसिद्ध झालें आहे.

### फोर्ड मोटर कं. लि.

इंग्लंडमधील फोर्ड मोटर कंपनी लि.च्या नोकरवर्गापैकी ३,५४१ नोकर लष्करांत दाखल झाले आहेत. त्यांपैकी ९१ लोक युद्धांत मरण पावले.

### हिंदुस्थानांतील रेडिओची वाढती लोकप्रियता

हिंदुस्थानांतील रेडिओ लायसेन्सची संख्या १ एप्रिल १९३९ रोजीं ७२,२८२ होती. १ एप्रिल १९४४ रोजीं ती १,८०,९९० झाली. वास्तविक ह्यापेक्षा ती पुष्कळच वाढली असती, परंतु रेडिओ सेटस बाजारांत मिळण्यांची अडचण पडत असल्यामुळें कित्येकांना रेडिओ घेण्याची आपली इच्छा अपूर्त ठेवावी लागत आहे. रेडिओचे कार्यक्रम देणाऱ्या नियतकालिकांचा खप पांच वर्षांचे अवधींत ३२,१५० वरून ९३,३५० वर गेला. म्हणजे, रेडिओ ऐकणारांत ज्या प्रमाणांत वाढ झाली, त्या प्रमाणांत ह्या नियतकालिकांचा खप वाढला नाहीं. मार्च १९४४ अखेर हिंदुस्थान सरकारचा रेडिओ खात्यावर ७७ लक्ष रुपये मांडवली खर्च झाला आहे व ऑल इंडिया रेडिओचा वार्षिक खर्च सुमारें ५० लक्ष रुपये आहे.

### ८ भाषांतून २७ वेळां दररोज बातमी

युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी ऑल इंडिया रेडिओवरून इंग्रजींतून चार वेळां, हिंदुस्थानींत तीन वेळां व बंगालींतून एकदा बातम्या सांगितल्या जात असत. आतां एकूण २७ वेळां आठ भाषांतून बातम्या सांगण्यांत येतात व त्यास सहा तास लागतात. बातम्यांच्या ह्या २७ वेळांची वर्गवारी खालीलप्रमाणें आहे:—

| भाषा | वेळा | भाषा | वेळा |
|---|---|---|---|
| इंग्रजी | ५ | तेलगू | ३ |
| हिंदुस्थानी | ४ | मराठी | ३ |
| बंगाली | ३ | गुजराती | ३ |
| तामीळ | ३ | पुश्तु | ३ |

### निजाम सरकार कोळशाच्या खाणी विकत घेणार

सिंगाराणी हें कोळशाच्या खाणींचें क्षेत्र निजाम हद्दींत वरंगळ जिल्ह्यांत आहे. जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचे डॉ. किंग ह्यांनीं १८७१ सालीं तेथील कोळशाचे थर शोधून काढले, त्यांतून आतांपर्यंत २ कोटि, ६० लक्ष टन कोळशाचें उत्पादन झालेलें आहे. निजाम सरकार ह्या कोळशाच्या खाणी सिंगाराणी कॉलिअरीज कंपनीकडून खरेदी करणार आहे.

### रेशिम

युद्धापूर्वी हिंदुस्थानांत दरसाल ४० लक्ष पौंड कच्चें सूत खपत असे, त्यापैकी २५ लक्ष पौंड सुताची आयात होई. त्याचप्रमाणें दरसाल २½ कोटि वार रेशमी कापड परदेशांतून येत असे. ही सर्व आयात आतां बंद पडली आहे. त्यामुळें मागणी व पुरवठा ह्यांमध्यें भयंकर तफावत पडली आहे आणि युद्धजन्य लष्करी मागणीमुळें बिनलष्करी गरज भागणें अशक्य झालें आहे.

### तुतीची लागवड

म्हैसूरमध्यें १९३९ सालीं तुतीखालीं ३० हजार एकर जमीन होती; आतां ७० हजार एकरांत तुतीची लागवड झालेली आहे.

### मुंबई सरकारचा औद्योगिक खात्यावरील खर्च

मुंबई सरकारनें १९४२ सालीं आपल्या औद्योगिक खात्यावर १२,०७,००० रुपये खर्च केला. खात्यास ६,४१,४५२ रुपये उत्पन्न झालें.

### शेतीच्या अवजारांसाठी पोलाद

शेतीच्या अवजारांसाठी खेडेगांवांतील लोहारांना लागणारें पोलाद त्यांस उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे.

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २५० | हिंदी अभिवृद्धीस अमेरिकेचें सहाय्य—मुंबई सरकारचें नवें कर्ज—मुंबई सरकारची समाधानकारक स्थिति | |
| २ रिझर्व्ह बँकेच्या कामाचा वृत्तांत ... | २५१ | ६ मागोरा कंपनीचा उपक्रम | २५५ |
| ३ विधवा स्त्रीस दत्तकाचा अधिकार ... | २५२ | ७ चेकच्या आकारावर नियंत्रण ... | २५५ |
| ४ डायरेक्टरांसाठी प्रॉक्सी | २५२ | ८ बँकेमधील व्यवहारांची माहिती ... | २५५ |
| ५ स्फुट विचार ... | २५४ | | |
| ब्रिटिश पार्लमेंटांत हिंदुस्थान-"न्यू स्टेटस्मन"चे उद्‌गार- | | | |

अर्थ

बुधवार, ता. ९ ऑगस्ट, १९४४

## रिझर्व्ह बँकेच्या कारभाराचा वृत्तांत

गेल्या जून अखेर पुऱ्या झालेल्या बारमाहींत रिझर्व्ह बँकेचा कारभार कसा झाला आणि तिच्या सांपत्तिक परिस्थितींत कोणते बदल झाले ह्याविषयींची माहिती त्या बँकेच्या मध्यवर्ती बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं भागीदारांस आपल्या वार्षिक वृत्तांतांत दिली आहे. हिंदुस्थानाची राष्ट्रीय बँक ह्या नात्यानें रिझर्व्ह बँकेस चलनाचा प्रसार व आकुंचन, व्याजाच्या दराचें व सरकारी रोख्यांच्या किंमतींचें नियमन, हुंडणावळीची व्यवस्था, सरकारच्या पैशाचा व कर्जाचा कारभार इत्यादि गोष्टी कराव्या लागतात आणि म्हणून तिचा वृत्तांत हा एक देशांतील सांपत्तिक घडामोडींचा त्रोटक आढावाच बनतो. बँकेच्या ताज्या वृत्तांतांत नमूद केलेल्या ठळक बाबींचा उल्लेख येथें करण्यांत येत आहे. युद्धपरिस्थिति आणि देशाचा युद्धप्रयत्न ह्यांचे योगानें उपस्थित होणाऱ्या आर्थिक घटनांशीं त्यांचा निकट संबंध असणें अपेक्षित आहे. उद्योगधंदे व व्यापार ह्यांची स्थिति वृत्तांताच्या वर्षी अनुकूल होती, हें कंपन्यांच्या भागांच्या किंमती चढीच्या राहिल्या ह्यावरून दिसून येतें, बँकांच्या चेक्सची वजावाट, रेलवेजचें उत्पन्न आणि त्यांनीं केलेली वाहिणींची ने-आण व मजूरीचे दर हींहि त्यांचीं गमकें आहेत. चेक्सची संख्या १,१४२ कोटींनीं वाढून ४,०५४ कोटि झाली व रेलवेजचें उत्पन्न १६·७ टक्यांनीं वाढून १७१ कोटि रुपये झालें. हिंदुस्थान सरकारनें स्वतःचा आणि मित्रराष्ट्रांच्या वतीनें खर्चलेला पैसा सारखा वाढत आला आहे. १९४३-४४ सालीं ही एकूण रकम ६९३ कोटि रुपये इतकी भरली. युद्धाचे प्रारंभापासूनचा ह्या खर्चाचा आकडा १,७६५ कोटि इतका झाला आहे. ह्याचा परिणाम तिहेरी झाला. एक तर युद्धसामुग्रीच्या पुरवठ्यास अग्रस्थान दिलें गेल्यानें सामान्य जनतेस आवश्यक असलेल्या वस्तूंचा तुटवडा पडला आणि त्यांच्या महागाईस आळा घालण्याचे उपाय योजावे लागले. दुसरें असें कीं, वाढत्या खर्चास लागणारा पैसा सरकारास कर्जाच्या मार्गानें उभा करावा लागला आणि ज्या मानानें तो उपलब्ध होऊं शकला नाहीं त्या मानानें रिझर्व्ह बँकेस चलनाचा विस्तार करणें प्राप्त झालें. तिसरा परिणाम असा झाला कीं ह्या नवीन चलनाची गंगाजळी ब्रिटिश सरकारकडून त्याचेसाठी ह्या देशांत खर्चलेल्या रुपयांच्या मोबदल्यांत मिळालेल्या स्टर्लिंगच्या स्वरूपांत लंडनमध्यें साठूं लागली आणि ती इकडे परत आणण्याचा प्रश्न अवघड होऊन बसला.

मालाची टंचाई, महर्गता, बंगालमधील दुष्काळ इत्यादि गोष्टींचा उल्लेख करून रिझर्व्ह बँकेच्या डायरेक्टरांनीं आपल्या वृत्तांतांत ह्या आपत्तीवर सरकारनें योजलेल्या विविध उपायांची माहिती दिली आहे. १९४३ च्या जून महिन्याचे अखेरीस हिंदुस्थानांतील बाजारभावांनीं उच्चांक गाठला होता. किंमतींचें हें सर्वसाधारण मान हळू हळू उतरून पुढें स्थिरावलें. बाजारभावांचें नियंत्रण आणि मालाच्या वांटणीची व्यवस्था हीं सदरहू परिणाम घडवून आणण्यास विशेष कारणीभूत झालीं. १९१४ सालांतील कलकत्त्यामधील किंमती १०० होत्या असें समजल्यास हा आकडा सप्टेंबर १९४३ मध्यें ३४९ वर जाऊन मे १९४४ मध्यें २९० पर्यंत खाली आला. धान्य व कपास ह्यांच्या किंमतींत ठळक दिसेल असा उतार झाला. वृत्तांताच्या वर्षांत परराष्ट्रीय व्यापारांत सुधारणा झाली आणि हिंदुस्थानच्या दुसऱ्या देशांकडून मिळावयाच्या व्यापारी येण्यांत वाढ झाली. कच्च्या मालाच्या निर्गतींत मोठी वाढ झाली, तिच्या मानानें पक्का माल अल्प प्रमाणांत देशाबाहेर गेला. परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर बहुतेक स्थिर राहिला. रिझर्व्ह बँकेनें वृत्तांताच्या बारमाहींत दहा कोटि पौंड किंमतीच्या हुंड्या विकत घेतल्या. ब्रिटिश सरकारकडून हिंदुस्थानास ह्या देशानें केलेल्या युद्धखर्चाचा पैसा सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडियामार्फत परत मिळाला त्याची निवळ रकम सोळा कोटि पौंड भरली. त्याच्या पूर्वीच्या वर्षांतला तत्सम आकडा तेहतीस कोटि पौंड होता. सोनें-चांदीच्या बाजारांत स्थिरता रहावी ह्या हेतूनें वायद्याचा व्यवहार नियंत्रित करण्यांत आला. रिझर्व्ह बँकेच्या सोनेविक्रीच्या धोरणामुळें त्या धातूची किंमत बरीच मर्यादित राहिली. चांदीची किंमत मध्यंतरीं चढली असली तरी अमेरिकन चांदीची आयात होणार ह्या बातमीचा परिणाम तीमध्यें उतार घडवून आणण्यांत झाला. १९४३-४४ सालीं सरकारी कर्जरोख्यांचा रोख एकंदरीनें वर जाण्याकडे होता. जपानच्या कारवायांमुळें मध्यंतरी कांहीं वेळां त्यांच्या किंमती उतरल्या असल्या तरी ही स्थिति अल्प-कालिकच दिसून आली. शतमानाचे तुलनात्मक आकडे असें दर्शवतात कीं (१९२७-२८ = १००) रोख्यांची सरासरी किंमत जून १९४३ मध्यें ११६·१ होती ती फेब्रुआरी, १९४४ मध्यें ११८·२ झाली आणि मार्च-एप्रिलमध्यें ११७ च्या घरांत जाऊन मेमध्यें सुमारें ११८ पर्यंत चढली. औद्योगिक मंडळ्यांच्या भागांच्या बाजारभावांची स्थितिहि अशाच प्रकारची होती. मे, १९४४ मध्यें पुऱ्या होणाऱ्या अकरा महिन्यांची ह्या भागांच्या किंमतीची सरासरी (१९२७–२८ = १००) १८६·६ होती. पूर्व वर्षाच्या ह्या मुदतीमधला सरासरीचा तत्सम आकडा १४९·३ होता. बदल्याचे व वायद्याचे करार सरकारी हुकुमानें बंद करण्यांत आले ह्याचा परिणाम भागांच्या किंमतीवर प्रतिकूल झाला, पण तो अल्प-कालिक होता. रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटांच्या खात्याचे व्यवहारांत पूर्व सालाच्या मानानें थोडी कमी अशी वाढ झाली. जनतेनें चलनाचा उपयोग व आपला खर्च मर्यादित करावा ह्यासाठीं सर-

कारनें चालवलेल्या प्रयत्नांचा हा परिणाम आहे. व्यवहारांत खेळणाऱ्या नोटांची रकम १९४२-४३ मध्यें २८५ कोटींनी वाढली होती, ती वृत्तांताच्या वर्षी १९९ कोटींनी अधिक म्हणजे १११ कोटि रुपये झाली. लोकांच्या हातांतील पैसा बाजारांतून न फिरतां त्याची बचत होऊन ती सरकार व बँक ह्यांचेकडे परत जाण्याचें महत्त्व त्यांच्याच हिताच्या दृष्टीनें किती मोठें आहे ह्याची आठवण वृत्तांताचे शेवटीं करून देण्यांत आली आहे.

## विधवा स्त्रीस दत्तकाचा अधिकार

### प्रिव्ही कौन्सिलचा निवाडा

राजपुतान्यांतील रघुवणी जातीचा अतलसिंग १९१८ मध्यें मरण पावला. त्याच्या विधवा पत्नीनें १९३५ सालीं एका मुलास दत्तक घेतलें. "माझ्या पतीनें माझ्या इच्छेप्रमाणें कोणासहि दत्तक घेण्याचा अधिकार मला दिला आहे" असें तिनें दत्तविधानाच्या कागदपत्रांत नमूद केलें. १९३७ सालीं ती मरण पावल्यावर, अतलसिंगाच्या दोन बहिणींनीं मालमत्ता ताब्यांत घेण्याचा प्रयत्न केला, त्याचें पर्यवसान दंगल व दत्तक मुलाच्या मूळ बापाचा खून ह्यांत झालें. अखेर, मालमत्ता रिसीव्हरच्या स्वाधीन करण्यांत आली, ती मिळविण्यासाठी दोघी बहिणींनीं काम चालविलें. डिस्ट्रिक्ट जज्ज व नागपूर हायकोर्ट ह्या दोघांनींहि विधवा पत्नीस दत्तकाचा अधिकार पतीनें दिलेला नव्हता, असा निर्णय केला; परंतु रघुवणी जातींत विधवा स्त्रीस दत्तकाचा अधिकार आहे असें नागपूर हायकोर्टानें ठरविलें. प्रिव्ही कौन्सिलकडे हें प्रकरण गेलें, तेथें हायकोर्टाचा निवाडा कायम करण्यांत आला.

---

### डायरेक्टरांसाठी प्रॉक्झी गोळा करणारा कंपनीचा नोकर

श्री. चंद्रशेखर द्विवेदी हे एशिअन ॲशुअरन्स कं. लि. चे मुंबईमधील ॲक्टिंग एजन्सी मॅनेजरचें काम करीत होते, त्यांस जुलै १९४१ मध्यें कंपनीनें कामावरून काढलें. ही गोष्ट कंपनीनें अयोग्य केली, असा श्री. द्विवेदी ह्यांचा मुंबई हायकोर्टांत दावा होता. १९४१ च्या वार्षिक साधारण सभेसाठी डायरेक्टरांकरितां प्रॉक्झी गोळा करण्याकरितां वास्तविक परगांवीं जात असतांहि कंपनीच्या कामासाठी आपण जात आहों, असा श्री. द्विवेदी ह्यांचा बहाणा होता, हें श्री. द्विवेदी ह्यांच्या बडतर्फीचें कारण होतें व तें सयुक्तिक आहे, असा कंपनीतर्फे युक्तिवाद करण्यांत आला. न्यायमूर्ति कोयाजी ह्यांनीं श्री. द्विवेदी ह्यांच्या बाजूनें निवाडा केला व त्यांस तीन महिन्यांचा पगार, प्रॉव्हिडंट फंडास कंपनीची काँट्रिब्यूशन आणि कोर्टखर्च हीं देवविलीं. न्यायमूर्ति आपल्या निवाड्यांत म्हणाले-"प्रतिवादी कंपनीच्या नोकरांची स्थिति बिकट होती. डायरेक्टरांकरितां प्रॉक्झी गोळा करा नाहींतर त्रास सोसावा लागेल, अशी त्यांस ताकीद होती, असें कंपनीचे डायरेक्टर व मॅनेजर मि. हेरेडिया ह्यांनीं सांगितलें. अशी वस्तुस्थिति असतांना, नोकराच्या कृत्यास गैरवर्तन म्हणणें कंपनीस शोभत नाहीं."

---


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

## पुणें शहर

**भांडवल :**

( ता. ३१-५-४४ रोजीं )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें | : | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें | : | रु. ५,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | : | रु. १,०८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | : | रु. ७५,००,००० चे वर |

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पद्मजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख

: शाखा :

पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,२३,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्केअर), जमशेदपूर कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट—एच्. ए. करीमभाई

# स्फुट विचार

## ब्रिटिश पार्लमेंटांत हिंदुस्थान

ग्रेट ब्रिटनच्या पार्लमेंटमध्यें दोन्ही सभांत हिंदुस्थानांतील राजकीय व आर्थिक परिस्थितीची चर्चा नुकतीच झाली. ह्या देशाच्या परिस्थितींत सुधारणा होण्याच्या दृष्टीनें तिचा उपयोग अत्यंत मर्यादित आहे असें म्हटलें पाहिजे. हिंदुस्थानांतील राजकीय वांधा मिटण्यास ती सहाय्यकारक होणार नाहीं, तरी कॉमन्स सभेच्या कांहीं सभासदांनीं व्यक्त केलेल्या विचारांचा ओघ त्या बाबतींत अनुकूल होता. युद्धप्रयत्न यशस्वी होण्यास राजकीय प्रश्न सोडवला गेला पाहिजे ह्या मुद्यास फारच थोड्या लोकांनीं महत्त्व दिलें. देशांतील पक्षोपपक्षांतील मतभेद इतके तीव्र आहेत कीं ते दूर होणें जवळजवळ अशक्य आहे आणि ह्यासाठीं युद्ध-समाप्तीपर्यंत त्यांच्या भानगडींत न पडणें बरें असाच सूर बहुतेक वक्त्यांच्या भाषणांत ऐकूं आला. आर्थिक प्रगति आणि अभिवृद्धि ह्यांचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून हिंदुस्थान सरकार योजना आखीत आहे ह्यासंबंधांत मि. एमरी ह्यांनीं समाधान व्यक्त केलें आहे आणि युद्ध चालू आहे तोंपर्यंत इतर वादग्रस्त प्रश्नांच्या भानगडींत पडण्याचें कारण नाहीं असा निष्कर्ष काढला आहे. तथापि, सध्या चाललेल्या घडामोडींचा आणि विचारविनिमयांचा परिणाम राजकीय परिस्थितीवरहि अनुकूल होण्याचा रंग दिसत आहे. हिंदुस्थानच्या हिताचे आर्थिक प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडवले जाण्यास युद्ध चालू असतांनाहि व युद्धोत्तर काळांत राष्ट्रीय जबाबदारीचें सरकार प्रस्थापित होणें अगत्याचें आहे. प्रो. हिल ह्या देशांत नुकताच दौरा करून गेले आणि औद्योगिक व भौतिकशास्त्रविषयक संशोधनाची व्यवस्था ह्या देशांत काय आहे आणि तिच्यामध्यें कोणत्या रीतीनें विस्तार व सुधारणा केल्या पाहिजेत ह्याविषयीं हिंदुस्थान सरकारास ते सूचना करणार आहेत. त्यांस हिंदुस्थानांतील राजकीय व आर्थिक परिस्थितीची चांगली कल्पना आली आहे. त्यांनीं कॉमन्स सभेंतील चर्चेत भाग घेतला आणि ब्रिटिश सरकारास असा सल्ला दिला कीं त्यानें हिंदी राजकीय प्रश्न सोडवण्यांत चालढकल करूं नये. ह्या कामीं दिरंगाई झाल्यास तिचे परिणाम दुर्घट होतील असाहि इशारा त्यांनीं दिला. हिंदी राजकीय प्रगतीस विरोध करणारा एक प्रबळ पक्ष इंग्लंडमध्यें आहे, पण युद्धपरिस्थिति आणि युद्धोत्तर काळांतील अभिवृद्धीच्या योजना ह्यांच्या दृष्टीनें त्याचें प्राबल्य मर्यादित होईल अशी अपेक्षा आहे. हिंदुस्थानांतील जातीय व इतर मतभेदांचा राष्ट्रीय ध्येयाच्या भावनेनें निरास होईल त्या मानानें ही अनुकूल परिस्थिति घडून येईल हें स्पष्ट आहे. आर्थिक प्रगति व राजकीय प्रगति ह्यांची ताटातूट करतां येत नाहीं. ह्या गोष्टी परस्परावलंबी आहेत ह्याची जाणीव ब्रिटिश पार्लमेंट व सरकार ह्यांस होणें अगत्याचें आहे.

---

## "न्यू स्टेटस्मन" चे उद्गार

कॉमन्स सभेंत मि. एमरी ह्यांनीं हिंदुस्थानांत करावयाच्या आर्थिक संवर्धनाच्या योजनांस प्राधान्य देऊन राजकीय सत्ता हिंदी लोकांच्या स्वाधीन करण्याचा प्रश्न टाळला ह्याविषयीं येथील औद्योगिक पुढाऱ्यांनीं असमाधान व्यक्त केलें आहे आणि राष्ट्रीय सरकारच्या स्थापनेविषयींचा आपला आग्रह अचल असल्याचें त्यांनीं बोलून दाखविलें आहे. मि. एमरी ह्यांच्या भाषणाचा अर्थ हिंदुस्थानांत लक्ष्यांत आला आहे, त्याचाच सूर इंग्लंड-मध्यें कांहीं वृत्तपत्रांनीं काढला आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. "न्यू स्टेटस्मन अँड नेशन" हें स्वतंत्र मतवादी पत्र म्हणतें कीं हिंदी आर्थिक उन्नतीविषयीं आजपर्यंत बेफिकीर राहून आताच एकदम मि. एमरी ह्यांस त्याबाबतींत उत्साहाचें भरतें आलें आहे, तें ठीक आहे; पण हिंदुस्थानच्या दारिद्र्याचा प्रश्न हिंदी लोकांनीं ह्याच देशांत सोडवला पाहिजे, तो ब्रिटिश सत्तेस सुटावयाचा नाहीं. मोठ्या प्रमाणावर शेतीचें व कारखान्यांचें उत्पादन वाढवयाचें तर ज्या नवीन व अपरिचित घटना हातीं घ्याव्या लागतील त्यांस सामान्य हिंदी जनतेचा पाठिंबा लागेल आणि तो राष्ट्रीय सरकारच मिळवूं शकेल अशी त्या पत्राची विचारसरणी आहे ती हिंदुस्थानांतील लोकमतास धरूनच आहे. लोकांच्या विश्वासावर व आदरावर आधारलेलें राष्ट्रीय सरकारच ह्या देशाची आर्थिक पुनर्घटना करूं शकेल, बाहेरून आलेल्या अधिकाऱ्यांच्या हातून तें काम होणें नाहीं असें "न्यू स्टेटस्मन अँड नेशननें" स्पष्ट बजावलें आहे.

---

## हिंदी अभिवृद्धीस अमेरिकेचें सहाय्य

युद्धोत्तर काळांत आपल्या व्यापाराची घडी पुन्हां नीट बसावी आणि स्वतःच्या आर्थिक जीवनाचें मान पूर्वीप्रमाणें उच्च दर्जाचें करावें अशी इच्छा इंग्लंड व अमेरिका ह्यांसारख्या औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या, संपन्न व श्रीमान् राष्ट्रांस असावी हें स्वाभाविक आहे. त्याप्रमाणें जगाच्या बाजारपेठांत आपला माल व भांडवल कोठें खपवतां येईल ह्याचा विचार त्या देशांत चालला आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक अभिवृद्धीची योजना फलद्रूप होण्यास इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतून यंत्रसामुग्री आणावी लागेल. कांहीं जातींचा माल अमेरिकेकडून विकत घेणें सोइस्कर व फायदेशीर होण्याचा संभव आहे. हिंदी बाजारपेठांत युद्धकाळांतील विशिष्ट गरजेस अनुसरून कांहीं ब्रिटिश माल येथील तुटवडा कमी करण्यासाठीं येत आहे. तो आणि इतर माल ह्यापुढेंहि येथें कसा खपवतां येईल ह्याची सूक्ष्म चर्चा इंग्लंडमध्यें चालली आहे. त्या देशाच्या येथील ट्रेड कमिशनरास ह्या विचारविनिमयाकरितां मुद्दाम लंडनला बोलावून नेण्यांत आलें आहे. हिंदुस्थानच्या स्टर्लिंग बाक्या लंडनमध्यें साचल्या आहेत, त्यांचा विनियोग ह्या देशानें ब्रिटिश माल खरीदण्यांत करावा अशी इंग्लंडमधील धंदेवाल्यांची स्वाभाविक इच्छा आहे. स्टर्लिंग शिलकी ब्रिटिश मालाच्या स्वरूपांत हिंदुस्थानांत परत आणाव्या लागतील. परंतु त्यांपैकीं कांहीं रकमांचे डॉलर्स करून मिळाल्यास ह्या देशास अमेरिकेकडून माल घेतां येईल आणि इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या स्पर्धेत हिंदुस्थानचा फायदा होईल. आंतरराष्ट्रीय चलननिधीमार्फत ही व्यवस्था व्हावी अशी जागतिक परिषदेंत हिंदी प्रतिनिधींनीं पुढें मांडलेली सूचना अमान्य झाली. तथापि, त्यांचें हें उद्दिष्ट अमेरिकन भांडवलवाल्यांच्या सहायानें साध्य करून घेतां येईल असें मि. ए. डी. श्रॉफ ह्यांचें म्हणणें आहे. नॅशनल सिटी बँक, मॉर्गन इत्यादि प्रमुख अमेरिकन भांडवलदारांशीं त्यांचें बोलणें चालू आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक अभिवृद्धीच्या पंधरा वर्षें मुदतीच्या योजनेनें अमेरिकन धंदेवाल्यांचें लक्ष आकर्षिलें असून ते जरूर तो पैसा ह्या देशास कर्जाऊ देण्यास तयार आहेत. आपला माल मोठ्या प्रमा-

णांत खपण्यासाठी दुकानदार किंवा उत्पादक गिऱ्हाइकांस तो उधार देतातच की नाहीं ! अमेरिकेनें यंत्रसामुग्री सारखा माल ह्या तऱ्हेनें हिंदुस्थानास पुरवल्यास तो व्यवहार सर्व बाजूंनी सोइस्कर होईल. स्टर्लिंग रोख्यांचें डॉलर करण्याचें त्या योगानें कारण उरणार नाहीं आणि अमेरिकेसारख्या प्रगतिपर राष्ट्राचें हिंदी आर्थिक अभिवृद्धींत सहकार्य मिळेल. ब्रिटिश व हिंदी धंदेवाल्यांनीं एकत्र येऊन खरेदी विक्रीच्या योजना आखाव्या अशी सूचना इंग्लंडमध्यें करण्यांत येत आहे तिचें रहस्य वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

---

## मुंबई सरकारचें नवें कर्ज

तीन टक्के व्याजाचें व चौदा वर्षांच्या मुदतीचें तीन कोटि, पन्नेचाळीस लक्ष रुपयांचें कर्ज काढण्याचें मुंबई सरकारनें ठरवलें आहे. ह्या कर्जाच्या पैशाचा विनियोग हिंदुस्थान सरकाराकडून एप्रिल, १९३७च्या पूर्वी प्रांतिक सरकारनें भांडवलाच्या पुरवठ्याकरितां काढलेल्या कर्जाची अंशतः फेड करण्याकडे व्हावयाचा आहे. रोख्यांच्या दर्शनी किंमती इतकी त्यांच्या विक्रीची किंमत राहील आणि ते १५ ऑगस्ट रोजींच कायते लोकांस मिळूं शकतील. सरकारास हवी आहे ती म्हणजे ३४४ लक्ष रुपयांची रकम अर्जदारांकडून मिळते आहे असें दिसतांच रोख्यांची विक्री बंद केली जाईल आणि कांहीं झालें तरी १५ ऑगस्ट रोजीं धंद्यांचे व्यवहार बंद होण्याच्या वेळेपुढें ती चालणार नाहीं. ठराविक रकमेपेक्षा रोख्यांविषयींचे अर्ज अधिक आले तर त्यांची प्रमाणबद्ध वाटणी मागणीदारांमध्यें केली जाईल आणि बाकीची रकम परत करण्यांत येईल. ह्या रकमेवर व्याज अर्थातच दिलें जाणार नाहीं. ह्या कर्जावरील व्याज दर सहामाही, १५ फेब्रुआरी व १५ ऑगस्ट रोजीं दिलें जाईल. तें प्राप्तीवरील करास पात्र राहील, पण ज्यांस तो कर द्यावा लागत नाहीं किंवा हलक्या दरानें तो द्यावा लागतो, अशा रोखे धारण करणारांस जरूर ते दाखले प्राप्तीवरील कराच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळतील. मुंबई सरकारची आर्थिक पत उच्च दर्जाची आहे. गेल्या चार वर्षांत त्याच्या उत्पन्नांत उत्कृष्ट वाढावा झाला आहे आणि त्यांतून दोन मोठ्या गंगाजळ्या अभिवृद्धीसाठीं निर्माण करण्यांत आल्या आहेत. सध्याचें नवें कर्ज मध्यवर्ती सरकारचें अधिक व्याजाचं जुनें कर्ज अंशतः फेडण्यासाठी काढण्यांत येत आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कर्जास भरपूर मागणी येईल ह्यांत संशय नाहीं.

---

## मुंबई सरकारची समाधानकारक सांपत्तिक स्थिति

आपला भांडवली स्वरूपाचा खर्च भागविण्यासाठी मुंबई सरकारनें १९३६-३७ सालापासून आजपावेतों कर्ज काढलेलें नाहीं आणि असला खर्च त्यानें आपल्या मामुली शिलकांमधून केला आहे. " बॉंबे डेव्हलपमेंट लोन " १९२० मध्यें काढण्यांत आलें होतें, त्याची फेड १९३५ मध्यें झाली आणि १९४२-४३ व १९४३-४४ मध्यें प्रत्येकीं साडेतीन कोटींचीं कर्जे काढलीं गेलीं तीं १९३७ च्या पूर्वीचीं मध्यवर्ती सरकाराचीं कर्जे फेडण्यासाठी काढण्यांत आलीं. ह्या दोन्हीं कर्जाच्या फेडीसाठी सिंकिंग व घसारा फंडाची तरतूद करण्यांत आली आहे. हिंदुस्थान सरकारचें एकूण १४ कोटी, १६ लक्ष रुपयांचें कर्ज फेडावयाचें आहे आणि तें १९३७-३८ पासून ४५ वर्षांच्या मुदतींत सारख्या सहामाही हप्त्यांनी परत करावयाचें आहे. त्यावरील व्याजाचा दर ४½ टक्के आहे आणि वार्षिक व्याजाची रकम ७८½ लक्ष रुपये होते. वरील १४ कोटी, १६ लक्षांपैकीं ३ कोटि, ७८ लक्ष मुंबई कॉर्पोरेशन करितां काढलेलें कर्ज असल्यानें मुंबई सरकारची निव्वळ जबाबदारी १० कोटी, ३८ लक्ष रुपये इतकीच उरते आणि त्या कर्जावर ६० लक्ष रु. व्याजासाठी द्यावे लागतात. स्टेट प्रॉव्हिडंड फंडाचें देणें ४ कोटि, ७८ लक्ष आहे. स्थानिक संस्थांकडून सरकारास येणें कर्ज १ कोटि २२ लक्ष आहे. ह्या सर्व रकमांची बेरीज-वजाबाकी केली असतां मुंबई सरकारास निव्वळ कर्ज २१ कोटि रुपये आहे असा हिशेब होतो. ह्या देण्याच्या मानानें सरकारची, जमिनी, इमारती, कालवे, रस्ते इत्यादि स्वरूपांतली जिंदगी किती तरी मोठी आहे. गेल्या चार वर्षांत सरकारच्या हिशेबांत सारखा वाढावा रहात आला आहे. त्यांतून गंगाजळ्या निर्माण केल्या जात आहेत. त्या सोडूनहि सरकारपाशी ७ कोटि, ९० लक्षांची मोकळी शिल्लक आहे आणि तिचा उपयोग मालाच्या खरेदीस लागणाऱ्या पैशाच्या पुरवठ्याकडे केला जात आहे.

---

## मित्रराष्ट्रांची उत्साहवर्धक युद्धप्रगति

हिटलरचे विरुद्ध झालेल्या लष्करी अधिकाऱ्यांच्या कटाचा उगम, हेतु व स्वरूप हीं कांहीं असोत, जर्मनींत बेदिली माजली आहे आणि नात्सी पक्षास प्रतिकूल अशी परिस्थिति निर्माण झाली आहे ह्यांत शंका नाहीं. असा असंतोष उत्पन्न न होईल तर तें आश्चर्यच समजावें लागेल. जर्मनींत व त्याच्या भोवतीं तीन रणांगणांवर अशा घटना होत आहेत कीं, हिटलरच्या आंधळ्या अनुयायांचाहि धीर खचल्यावांचून रहाणार नाहीं. रशियन फौजा झपाट्यानें व धडाक्यानें पुढें चालल्या असून पूर्व प्रशियाच्या नजीक येऊन ठेपल्या आहेत. इटलींत जर्मन सैन्याची सारखी पीछेहाट होत आहे. पश्चिमेच्या बाजूस नॉर्मंडी प्रांताशिवाय ब्रिटनीमध्येंहि मित्रराष्ट्रांच्या फौजा शिरल्या आहेत. ह्या रीतीनें जर्मनीच्या मानेभोवतीं फास घट्ट बसूं लागला आहे. तुर्कस्थाननें जर्मनीशीं असलेले संबंध तोडून टाकले आहेत, हा मित्रराष्ट्रांचा विजय व जर्मनीचा पराभवच आहे. जर्मनीच्या चढाईचे दिवस मागेंच संपले. पण आतां बचावाच्या युद्धांत त्यास सारखी हार खावी लागत आहे. फ्रान्समध्यें जर्मन सैन्यें निकरानें लढत असलीं तरी त्यांस माघार घ्यावी लागत आहे आणि रशियन आघाडीवर तर त्यांस पळतां भुई थोडी झाली आहे. शत्रूचें लढाऊ बळ खच्ची होत आहे, आणि मि. चर्चिल ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितल्याप्रमाणें युरोपांतील युद्ध पूर्वकल्पनेपेक्षा लवकर संपण्याचीं चिन्हें दिसत आहेत. आसाम सरहद्दीवर आणि उत्तर ब्रह्मदेशांत जपाननें अलीकडे चांगलाच मार खाल्ला आहे आणि पॅसिफिक महासागरांत अमेरिकेची चढाई यशस्वी रीतीनें चालली आहे. ही युद्धाची एकूण परिस्थिति अत्यंत उत्तेजनकारक आहे.

---

## ट्रेझरी बिलांवर ७ आ. ९ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ४ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ७ आ. ९ पै इतका पडला. एप्रिल, मे व जून महिन्यांत विकलेल्या ट्रेझरी बिलांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. अनुक्रमें १२ आ. ७ पै, ८ आ. ८ पै व ७ आ. ३ पै असा पडला होता.

## मागोरा कंपनीचा अभिनंदनीय उपक्रम

कै. न्या. मू. मा. गो. रानडे यांचें स्मरणार्थ स्थापन झालेल्या मागोरा कंपनीनें नवीनच बांधलेल्या बॉंडेड लॅबोरेटरीचा उद्घाटन समारंभ सुपरिंटेंडेंट ऑफ एक्साइज रा. सा. एम. एस. नवलकर, एम. ए. यांचें हस्तें कंपनीचे जागेंत रविवार ता. ३० जुलै १९४४ रोजीं मोठ्या थाटानें करण्यांत आला. सदर प्रसंगीं कंपनीचे चेअरमन, श्री. बाबूकाका रानडे, डॉ. एन. एल. रानडे, डॉ. के. सी. घारपुरे, प्रो. डी. बी. लिमये, मॅनेजिंग एजन्ट, रा. रा. य. रानडे, रा. सा. नवलकर व रा. हरिभाऊ जोशी इत्यादींचीं भाषणें झालीं. रा. रा. य. रानडे यांनीं आपलें भाषणांत रा. सा. नवलकर यांनीं केलेल्या बहुमोल साहाय्याबद्दल त्यांचे आभार मानून रा. सा. नवलकर हेच गृहस्थ अनावरण समारंभास योग्य असल्याचें सांगितलें. रा. सा. नवलकर यांनीं आपलें भाषणांत बॉंडेड लॅबोरेटरी म्हणजे काय हें विशद करून सांगून अशा तऱ्हेचा धंदा पुण्यासारख्या तज्ज्ञ व विद्वान लोकांनीं भरलेल्या शहरांत अजून कोणीहि सुरू केलेला नाहीं व हा उपक्रम मागोरा कंपनीनें केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केलें. त्याचप्रमाणें हल्लींच्या डॉक्टर लोकांमध्यें, इंग्रजी पद्धतीनें हिंदुस्थानांत तयार केलेल्या औषधाबद्दल जो गैरविश्वास असतो, त्याबद्दल नापसंती व्यक्त करून जनतेनें दिवसेंदिवस देशी मालाला जास्त उत्तेजन द्यावें असें आग्रहानें प्रतिपादन केलें.

सरतेशेवटीं कंपनीचे डायरेक्टर मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांचे गायनाचा कार्यक्रम होऊन हा समारंभ समाप्त झाला.

इतकी खटपट करून रा. रा. य. रानडे यांनीं हा मोठा धंदा पुण्यासच प्रथम सुरू केला याबद्दल त्यांचें व कंपनीचें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच आहे.

---

## चेकच्या आकारावर नियंत्रण व बँकांची अडचण

कागदाच्या खपाचें नियंत्रण करणाऱ्या आर्डिनन्समधील एक कलम बँकांच्या चेक्सना लागू पडतें. ९ इंच लांब व २३⁄४ इंच रुंद ह्या आकारापेक्षा मोठ्या आकाराचा चेक छापणें किंवा खातेदारांना पुरविणें ही गोष्ट बँकांना करतां येणार नाहीं. तथापि, अगोदरच छापलेले कित्येक कोरे चेक बँकांजवळ असणारच. असे चेक ३० नोव्हेंबर, १९४४ पूर्वी बँकांनीं खातेदारांना देऊन टाकले पाहिजेत व १२ जून १९४४ रोजींचा कोऱ्या चेक्सचा साठा १ ऑगस्ट १९४४ रोजीं सरकारास कळविला पाहिजे असेंहि ऑर्डिनन्स सांगतो. कित्येक लिमिटेड कंपन्यांच्या चेक्सवर दोन किंवा तीन सह्या असतात, त्यांस वरील ऑर्डिनन्स थोडासा गैरसोईचा वाटेल, कारण चेकवर ह्या सह्या बारीक टाकानें व काळजीपूर्वक करणें आतां आवश्यक होईल. सही करणारांचे अधिकार व हुद्दे दर्शविणारे रबर स्टॅंपहि बदलून लहान करावे लागतील. ह्याहिपेक्षा खरी अडचण, बँकांनीं ३० नोव्हेंबर, १९४४ पूर्वी आपला चेक्सचा साठा संपविण्याच्या अटीसंबंधांतील आहे. पुष्कळ बँकांजवळ दोन-तीन वर्षे पुरतील इतके चेक छापून तयार असतात, ते कापून लहान करणें किंवा ऑर्डिनन्स रद्द होईपर्यंत ते तसेच ठेवून नवे लहान चेक छापणें किंवा ते रद्दी समजून रांध्यासाठी कागदाच्या गिरणीकडे पाठविणें, ह्यापैकी कोणतीहि गोष्ट ऑर्डिनन्समधील अट पुरी करणारी असली तरी व्यावहारिक ठरणार नाहीं. सरकारनें ह्या अडचणींचा विचार करणें श्रेयस्कर ठरेल.

## बँकेमधील व्यवहारांच्या जमाखर्चाविषयीं थोडीशी माहिती

(१)

बँकेमधील व्यवहार जितक्या दक्षतेनें करावे लागतात तितक्याच तत्परतेनें त्या व्यवहारांची नोंद बँकेच्या जमाखर्चाच्या निरनिराळ्या पुस्तकांतून व्हावी लागते. बँकेचे जमाखर्च व्यवस्थित, काळजीपूर्वक व तत्परतेनें लिहिल्यास बँकेशीं व्यवहार करणाऱ्या लोकांचा बँकेविषयींचा विश्वास तर वाढतोच पण त्याबरोबरच बँकेच्या व्यवस्थापकांना बँकेंत झालेल्या व्यवहारांचा लेखी व बिनचूक पुरावा मिळतो. त्यांना बँकेंत चाललेले व्यवहार फायदेशीर रीतीनें चालले अगर एखाद्या बाबतींत प्रमाणापेक्षा अधिक खर्च होत आहे, याची कल्पना पाहिजे त्या वेळीं मिळतें.

दोन व्यक्तींमध्यें अगर व्यक्तींच्या दोन गटांमध्यें पैशाच्या अगर इतर कोणत्याही स्वरूपांत होणाऱ्या देवघेवींच्या व्यवहारांची नोंद वरील सोयीच्या दृष्टीनें जमाखर्चांत करावयाची असते. आपणाकडे जमाखर्च लिहिण्याची पद्धत फार पूर्वीपासून आहे व आपली जमाखर्च लिहिण्याची देशी पद्धतीच व्यापाऱ्यांमध्यें फार मोठ्या प्रमाणांत प्रचलित आहे. परंतु बँकांची सध्याची कल्पना जशी आपणाकडे परदेशांतून आली त्याबरोबरच त्यांची जमाखर्च लिहिण्याची पद्धतही आपल्या बँकांनीं उचलली व तिचा प्रसार आपणाकडे झाला.

देशी पद्धतींत जमाखर्चांत 'रोखीचे व्यवहार' व 'दुबेरजी' व्यवहार असे दोन प्रकार झालेल्या व्यवहारांत पाडलेले प्रामुख्यानें दिसतात; परंतु 'येणें' व 'देणें' ही प्रत्येक व्यवहाराची दोन अंगें आहेत व येणें व देणें या दोनहि व्यवहारांची नोंद करण्याच्या दृष्टीनें जमाखर्च लिहिण्याची जी पद्धत तिला ( Double Entry ) अगर दुबेरजी जमाखर्चाची पद्धत असें म्हणतात. सर्व बँकांतून बहुधा हीच पद्धत अस्तित्वांत आहे.

आपण ज्यावेळीं लोकांचे देणें असतो त्यावेळीं तितकी रक्कम आपल्या वहींत आपण त्यांचे नांवे जमा करतो व लोकांकडील येणे पैसे आपल्या वहींत त्यांचें खातीं नांवें लिहिलेले असतात. जमेचे व्यवहार जमाखर्चाच्या वहींत डाव्या बाजूस लिहितात व नांवेचे व्यवहार उजव्या बाजूस लिहितात.

प्रत्येक व्यवहार होतेवेळीं त्यांची थोडक्यांत माहिती देऊन त्याप्रमाणें जमेची व खर्चाची वेगवेगळीं व्हावचर्स तयार केली जातात. झालेल्या व्यवहाराचा तात्काळिक लेखी पुरावा या दृष्टीनें यांचें महत्त्व फार आहे. या व्हावचर्सच्या आधारावरून रोजच्या झालेल्या व्यवहाराची नोंद करून त्या दिवसाची शिल्लक ज्या पुस्तकांत काढलेली असते त्यास Day book अगर रोजकीर्द असें म्हणतात. सोयीच्या दृष्टीनें होणाऱ्या व्यवहाराच्या निरनिराळ्या प्रकारच्या खारेपणावरून खातेवार व्हावचर्स लावून घेऊन त्याप्रमाणें ही रोजकीर्द लिहिली जाते त्यामुळें विशिष्ट खातीं रोज किती उलाढाल झाली हेंही कळतें.

निरनिराळ्या खात्यांत रोजच्या रोज किती रक्कम आली अगर गेली हें रोजकीर्दीवरून कळेल परंतु एका विशिष्ट खात्यांत आजपर्यंत किती रक्कम आली, किती गेली व आज त्या खात्याची परिस्थिति काय आहे हें समजण्याच्या दृष्टीनें झालेल्या व्यवहारांची खातेवार नोंद ज्या पुस्तकांत केली जातें तिस खतावणी अगर 'लेजर' असें म्हणतात.

ह. वा. सहस्रबुद्धे

**जिकडे तिकडे प्रशंसा**

इमिटेशन दागिन्यावर रासायनिक क्रिया करून सन्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री द्याली. सोन्याच्या पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.

जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे

( सरकार खात्यानें मान्यता दिलेले )

**टोमॅटो केचप ( गोड ) व**

**टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]**

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

**रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें**

बिझिनेस ऑफिसः ९११ अ सदाशिव, पुणें २.

तुमच्या आवडींत व ऐपतींत प्रसिद्धीचें प्रभावी साधन

**कॅलेंडर्स**

**( १९४५ )**

नवीन आकर्षक चित्रांचा आल्बम तयार होत आहे.—

प्रमुख ठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.

**दि आर्ट कॅलेंडर्स लि.**

१५ बुधवार पेठ, पुणें २

पुण्यांतील

**आदर्श निवासस्थान व भोजनालय**

**छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस**

बुधवार चौक, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा

**मैलाचा — दगड**

सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११० टक्के वाढ |
| चालू कामांत | १०० टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

**दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.**

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

**JUST PUBLISHED**

**INDIAN RURAL PROBLEM**

BY

Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.

( Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay ).

Price Rs. 8

( Postage extra ).

*Sole Selling Agents :—*

THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.

9, Bakehouse Lane, FORT, BOMBAY.

Telephone 779

**GUEST HOUSE**

TELEGRAM Guest House Poona 2.

**पुना गेस्ट हाऊस**

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.